---

## "नेतृत्व विकास कार्यशाळा" - (१४-१५ ऑक्टोबर २०१७)

## कार्यशाळा - भाग ३ चा अहवाल

दिनांक : १६ ऑक्टोबर २०१७

रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनीच्या "संस्था बांधणी आणि नेतृत्व अध्ययन केंद्र" तर्फे विविध क्षेत्रातील व्यक्तींसाठी एकूण ६ दिवसांच्या "नेतृत्व विकास कार्यशाळेचे" आयोजन पुणे येथे करण्यात आले होते. ही कार्यशाळा ३ महिन्यांमध्ये विभागली होती. या कार्यशाळेचा भाग - ३ शनिवार-रविवार, दिनांक १४ व १५ ऑक्टोबर २०१७ रोजी संपन्न झाला.

कोणत्याही क्षेत्रामध्ये उद्याचे नेतृत्व म्हणून स्वत:ची तयारी करण्यासाठी नेतृत्व कौशल्य, व्यवस्थापन कौशल्य व नियोजन कौशल्य इत्यादी कौशल्ये यावीत तसेच स्वामित्व भावना अंगी रुजवण्यासाठी, निर्णय क्षमता वाढवण्यासाठी आवश्यक क्षमतांचा अभ्यास व व्यासंग वाढवण्यासाठी मार्गदर्शन करणे या उद्देशाने कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यशाळेच्या या भागामध्ये ***श्रवणकला व समुपदेशन, माहितीचा अधिकार कायदा, संघबांधणी व संघटन कौशल्य, सामाजिक बांधिलकी व सामाजिक गरजांचे शोधन, पर्यावरणस्नेही विकासनिती, निसर्गस्नेही जीवनशैली आणि कार्यसंस्कृती*** या विषयांवर चर्चासत्रांचे आयोजन करण्यात आले होते.

अनुभवी मानसशास्त्रतज्ज्ञ, संशोधिका व समुपदेशक *डॉ. अनघा लवळेकर* यांनी श्रवणकला व समुपदेशन या विषयावर पहिल्या चर्चासत्राद्वारे सहभागींबरोबर संवाद साधला. लक्षपूर्वक ऐकून घेण्याची कला, सवयी किंवा कौशल्य कसे विकसित करावे, ऐकून घेण्याचे आयाम, हे ऐकून घेतल्यावर वैयक्तिक व गटाचे समुपदेशन कसे करावे? ऐकणे व श्रवण करणे यातील फरकाचे मुद्दे, जागृत श्रवण करताना काय करावे व काय करू नये यासंबंधी उपयुक्त मार्गदर्शन या सत्रामध्ये वक्त्यांनी केले. समुपदेशनाचा भाग हा श्रवणकौशल्यावर आधारलेला असतो. जागृत श्रवणकौशल्याची प्रचिती येण्यासाठी सहभागींना वेगवेगळ्या गटांमधून बसवून त्यांना दैनंदिन जीवनातील विविध प्रसंगांचे सादरीकरण करण्यास सांगितले आणि त्याप्रसंगांचे निरिक्षण व पृथ्क्करण करून श्रवणकला व समुपदेशन हा विषय अत्यंत सोपा करून सांगण्यात आला.

कार्यशाळेच्या दुसरे सत्रामध्ये महाराष्ट्रातील माहिती अधिकार कायद्याचे अभ्यासक *श्री. विवेक वेलणकर* यांनी माहितीचा अधिकार कायदा याविषयी सहभागींना आकलन करून दिले. समाजाचे, संस्थेचे नेतृत्व करत असताना नेत्याला तसेच सामान्य जनतेला या कायद्याविषयीचे ज्ञान असणे अत्यंत आवश्यक आहे त्यामुळे या विषयाचे आयोजन करण्यात आले होते. या कायद्याविषयीचे आकलन करून देताना प्रथम या कायद्याचा इतिहास सांगण्यात आला. त्यानंतर त्याची गरज, व्याप्ती स्पष्ट करण्यात आली, या कायद्यांतर्गत कोण-कोणत्या संस्थांना हा कायदा लागू होतो व माहिती अधिकारात काय प्रकारची माहिती आपल्याला मिळू शकते या विषयीची माहिती वक्त्यांनी सागितली. त्यानंतर विविध आवश्यक माहिती मिळवण्याची प्रक्रिया, अधिक माहितीसाठीच्या वेबसाईटस आणि विविध सामाजिक क्षेत्रातील उदाहरणांसह माहिता अधिकाराची उपयुक्तता सांगण्यात आली.

कार्यशाळेचे तिसरे सत्र ट्रेनर, मोटिव्हेटर, कुशल संघटक तसेच अनेक आघाड्यांवर नेतृत्व करणा-या *सौ. शर्मिला ओसवाल* यांनी संघबांधणी आणि संघटन कौशल्य या विषयावर नाविन्यपूर्ण पद्धतीने मार्गदर्शन केले. संघप्रवृत्तीतून संघबांधणी याबद्दल सांगताना वक्त्यांनी संघबांधणीसाठी आवश्यक सकरात्मक मानसिकता, संघप्रवृत्ती विकसित करण्यासाठी आवश्यक गुणवैशिष्ट्ये, संघबांधणीतील महत्वाचे टप्पे, तसेच नेत्याने, संघनायकाने कार्यकर्त्यांना, सहका-यांना देण्याचे सकारात्मक स्ट्रोक्स (शाब्दिक, कृतीद्वारे व देहबोलीतून) इत्यादी मुद्द्यांद्वारे संघबांधणी (Team Building) हा विषय सहभागींसमोर मांडला. वक्त्यांनी

सहभागींकडून कागद व रंगीत पेन्सचा उपयोग करून छोटी पण नाविन्यपूर्ण कृतीच्या आधारे हा विषय अधिक सोपा करून सांगितला.

कार्यशाळेच्या चौथ्या सत्रामध्ये *श्री. प्रमोद कुलकर्णी* यांनी सामाजिक बांधिलकी आणि समाजिक गरजांचे शोधन या विषयावर सहभागींना मार्गदर्शन केले. भारतीय जीवन पद्धतीतील सार्वत्रिक सेवेची संकल्पना, आधुनिक काळातील सेवेची संकल्पना आणि सामाजिक उद्योजकता या विषयी अत्यंत उपयुक्त मार्गदर्शन केले. या सामाजिक उद्योगासाठी आवश्यक सामाजिक गरजांचे शोधन करताना ग्रामसभा, सर्वेक्षण, मुलाखती, लक्ष्यगटांच्या बैठका, संसाधनांची यादी व सामाजिक नकाशा या पद्धतींचा वापर कसा करायचा या विषयी उपयुक्त मार्गदर्शन केले.

कार्यशाळेच्या शेवटच्या दिवशीच्या पहिल्या व दुस-या सत्रामध्ये पर्यावरणस्नेही विकासनिती, निसर्गस्नेही जीवनशैली या विषयावर *श्री. दिलीप कुलकर्णी* यांनी अत्यंत तळमळीने व शास्त्रीय पद्धतीने मांडणी करून सहभागांना विषयाचे गांभीर्य लक्षात आणून दिले. या सत्रामध्ये वक्त्यांनी पर्यावरणाचा विनाश न करता एकूण देशांतर्गत उत्पादन (जी.डी.पी.) कसे वाढवावे हे समजावून सांगितले. प्रकृती - संस्कृती - विकृती हे जीवनशैलीचे टप्पे, तसेच सोपे तंत्रज्ञान, स्थानिकता, विकेंद्रिकरण, पूनर्घटन याचा अवलंब केला तर निसर्गस्नेही जीवनदृष्टी व जीवनशैली माणसाला अशक्य नाही हे वक्त्यांनी अनेक उदाहरणांद्वारे व स्वत: स्विकारलेल्या निसर्गस्नेही जीवनशैलीद्वारे एक वस्तूपाठ सहभागांना घालून दिला.

कार्यशाळेच्या अंतिम सत्रामध्ये *श्री. श्याम भुर्के* यांनी कार्यसंस्कृती या विषयावर मार्गदर्शन करताना, सांगितले की संस्थाजीवनामध्ये कार्यसंस्कृतीला अनन्य साधारण महत्व आहे. संस्थेचा गुणात्मक दर्जा कसा आहे याला जास्त महत्व आहे. संस्थेतील कार्यकर्त्यांची मानसिकता, प्रवृत्ती, प्रेरणा, क्षमता-कौशल्ये, तंत्रकौशल्ये, दृष्टीकोन यांचे एकत्रीकरण म्हणजे त्या संस्थेची कार्यसंस्कृती. संस्थेचे उपयुक्तता मूल्य, संस्थेचा मानसिक व वैचारिक आरसा म्हणजेच त्या संस्थेची कार्यसंस्कृती असे सांगून कार्यशाळेचा समारोप केला.

अशाप्रकारे एकूण २३ सत्रांची ही नेतृत्व विकास कार्यशाळा अत्यंत उत्साहात पूर्ण झाली. सर्व सहभागींनी एकूण कार्यशाळेच्या आयोजनाविषयी, संकल्पनेविषयी व वक्ता निवडीविषयी आणि कार्यशाळेमुळे सहभागींच्या दृष्टिकोनात झालेल्या सकारात्मक बदलासंदर्भात चांगला अभिप्राय देऊन रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनीच्या “संस्था बांधणी आणि नेतृत्व अध्ययन केंद्र” तर्फे होणा-या अगामी विविध कार्यशाळांमध्ये सहभागी होण्यास उत्सुकता दर्शवली.

कार्यशाळेतील सहभागींच्या काही बोलक्या प्रतिक्रिया :-

१. रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनीची ही नेतृत्व विकास कार्यशाळा समाजाच्या सर्व क्षेत्रामध्ये उपयुक्त आहे. जीवनाकडे बघण्याचा दृष्टिकोन बदलणारी कार्यशाळा होती. **- श्री. अनिल म्हस्के**

२. कुटुंब, समाज व देशासाठी एक उत्तम माणूस घडवण्याचे कार्य या कार्यशाळेद्वारे रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनी करत आहे. **- सौ. सुनिता घोडे**

३. मी स्वत: भा.ज.पा.च्या युवा / युवती मोर्चामध्ये काम करते. तेथे मी आधी काहीच बोलत नव्हते. परंतु या कार्यशाळेमुळे माझ्यातील आत्मविश्वास वाढला आहे. आता मी स्टेज शेअर करते. बोलताना, वागताना, विषय मांडणीत विचार करून बोलते. हे सर्व मी या कार्यशाळेमध्ये शिकले. **- सौ. अपर्णा लोणारे**

४. या कार्यशाळेमुळे माझ्या व्यक्तिमत्त्वामधील अनेक सूप्त गूण उजळून निघतील. ही कार्यशाळा नेतृत्वाचा विकास तर करतेच पण समाजाचे आपण काही तरी देणे लागतो याची जाणीव करून देते. ग्रामीण भागामध्ये सदर कार्यशाळा सुरू केल्यास तेथील तरूण वर्गामध्ये अमुलाग्र बदल होईल असे वाटते. **- विधीज्ञ सोमनाथ वैद्य**

कार्यशाळेतील सर्व वक्त्यांनी सहभागात्मक, चर्चात्मक, विविध खेळ, कृतींद्वारे, उदाहरणे तसेच केसस्टडीद्वारे आपल्या विषयांची मांडणी केली.

कार्यशाळेच्या शेवटी सर्व सहभागींना यशस्वी सहभगाबद्दल प्रमाणपत्राचे वितरण समारोपाचे वक्ते श्री. श्याम भुर्के यांच्या हस्ते करण्यात आले.

राहुल टोकेकर
कार्यालय अधीक्षक
रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनी
संस्था बांधणी आणि नेतृत्व अध्ययन केंद्र, पुणे